


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १८८ • पुणे • शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



# सल्ला नको; हवा संवाद!



शंभरांपैकी अकरा व्यक्ती अस्वस्थ आहेत. त्यांना बोजड सल्ला नको. मैत्रिपूर्ण संवाद हवा आहे. नागपूरच्या 'माइंडलाइन'ने त्यात आघाडी घेतली आहे. भारतातील मानसिक विकारांचा विळखा वाढतो आहे. मनोविकारांशी झुंजणाऱ्या देशातील अंदाजे ८० टक्के रुग्णांपर्यंत समयोचित उपचार पोहोचत नाहीत. इंडियन सायकिॲट्रिक सोसायटी त्यामुळे चिंतित आहे. जागतिक विकलांगतेच्या प्रमुख कारणांमध्ये मानसिक आरोग्य समस्यांचा समावेश होतो. पाच वर्षांपर्वी जागतिक स्तरावर दर सातपैकी एक व्यक्ती तणावाखाली होती. ही संख्या ११० कोटींहून अधिक आहे. भारतात, दर शंभरपैकी अंदाजे अकरा व्यक्ती या समस्येशी झुंजत आहेत. मनोआजारांवर महिलांच्या तुलनेत मदत मागण्याचे जगभरातील पुरुषांचे प्रमाण ४० टक्क्यांनी कमी आहे. आपण अबला नाहीत अशी धारणा पुरुषांमध्ये टोकदार असते. पुरुषत्वाच्या खुळचट कल्पना त्यासाठी कारणीभूत आहेत. भावनिक होणे ही स्वभावातील न्यूनता नव्हे. 'उन आंखों हंसना भी क्या, जिन आंखो में पानी ना हो...' ही सुंदर ओळ संतोष आनंद यांनी 'क्रांती' चित्रपटात लिहिली होती. मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असणाऱ्यांना बौद्धिक डोस देणाऱ्या तज्ज्ञांपेक्षा निखळ आणि मैत्रिपूर्ण संवादाची ओढ असते. बोलण्यातील मोकळेपणा त्यांना हवा असतो. त्यासाठी अस्थिर मनांचा शोध सातत्याने सुरू असतो. अशा बेचैन किंवा व्याकूळ रुग्णांना दिलासा देणारी अकुटिल मने समंजस समाजात परिपक्व समजली जातात. दुसऱ्याच्या दु:खाचा उपहास ही विकृती आहे. प्रगल्भ वर्तणुकीची आपल्या समाजात चणचण आहे. प्रत्येकाशी विवेकी वागणाऱ्यांना गृहीत धरले जाते. सभ्यता, सदाचाराची ओढ गैर नाही. अभिनिवेशी लोक अशांची गणती अजागळांत करतात. दुबळ्यांपुढील अहंगंडाचे क्षणिक धुपारे आयुष्यात आपल्यालाच जाळणार असल्याची जाणीव त्यांना नसते. हात पाय दुखतात तसे मन दुखू शकते ही कल्पना त्यांच्या गावीही नसते. म्हणूनच मनोमापन करणारा सुबुद्ध समाज आपल्याला हवा आहे. जगभरात कौटुंबिक समस्यांनी हैराण होणारे जीव बरेच आहेत. 'फॅमिली' शब्दाचा उद्भव लॅटिनमधील 'फॅमिलीआ'पासून झाला. घरगुती व्यवस्था असा त्याचा मूळ अर्थ आहे. सामाजिक आणि मानसिक नात्यांनी परस्परांशी बांधलेल्या व्यक्तींच्या समूहाला कुटुंब म्हणतात. पाश्चात्त्य समाज व्यक्तिवादावर भर देतो. याउलट भारतीय समाज सामूहिक स्वरूपाचा आहे. भारतीय कुटुंबे सख्ख्या नातलगांच्या काळजीत गुंततात. त्यातूनच पाश्चात्त्यांच्या तुलनेत मनोविकारांचा भार जादा सोसतात. अध्यात्माचा उपयोग तणावरहित आयुष्यासाठी परिणामकारक ठरू शकतो. मानसिक आरोग्य म्हणजे फक्त आनंदी राहणे नव्हे. त्यात मानसिक, भावनिक, सामाजिक, शारीरिक क्षमतांचा समावेश होतो. मन जपले तर आव्हानांना सामोरे जाण्याची ऊर्मी निर्माण होते. विदर्भात पुरुष शेतकऱ्यांच्या तुलनेत ग्रामीण महिलांच्या आत्महत्या नगण्य आहेत. कित्येक तुटलेली घरे त्यांनी सांभाळली. असे असतानाही महिलांचे मानसिक सामर्थ्य दुर्लक्षित राहते. शहरी युवक घनिष्ठ मित्रांच्या तुलनेत मैत्रिणींपासून मानसिक कमकुवतपणा लपवतात. कोणत्याही घुसमटीचा निचरा आवश्यक असतो.

नागपुरात या दृष्टीने सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे. मनातील साचलेपणावर 'माइंडलाइन' उपक्रमातून धडपड्या प्रगतिशील गटाने संवादी पुढाकार घेतला आहे. सर्व वयोगटांतील संभ्रमित मने मोकळी व्हावीत म्हणून त्यांनी एक व्यासपीठ तयार केले. तेरा जणांचा प्रशिक्षित चमू निरंतर मदतीसाठी सज्ज झाला आहे. नातेसंबंध, पालकत्व, शिक्षण, करिअरसह अनेक मुद्द्यांवरील शंकांवर नि:शुल्क 'सल्ला नव्हे; संवादा'ची भूमिका 'माइंडलाइन'ने घेतली आहे. एकतर्फी मूल्यमापन न करता ऐकून घेण्याची उमज त्यांनी प्रयत्नांती विकसित केली. मनातील कुचंबणा टाळण्यासाठी ते देशव्यापी मोफत संवादासाठी तत्पर आहेत. भावनिक कोंडीमुळे खिन्न राहण्यापेक्षा 'माइंडलाइन'शी बोलता येईल. ही शुभवार्ता मानसिकदृष्ट्या विकल चरणांपर्यंत पोहचविण्याचे आव्हान आता सजग, सक्षम मनांना स्वीकारावे लागेल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये रामनवमी उत्साहात साजरी

नऱ्हे (पुणे) (आरंभ पर्व) : नऱ्हे येथील संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रभू श्रीराम जन्मोत्सव अर्थात 'रामनवमी'चा सण अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाच्या संचालिका सौ. राधिका गिरमे यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर संपूर्ण परिसर रामनामाच्या गजराने दुमदुमून गेला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी रामायणातील विविध प्रसंगांवर आधारित नाटिका व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः 'राम-लक्ष्मण-सीता' यांच्या वेशभूषेतील लहान विद्यार्थ्यांनी साकारलेली भूमिका सर्वांचे लक्ष वेधून घेणारी ठरली. कार्यक्रमात 'रामरक्षा स्तोत्र' पठण तसेच 'श्रीराम जय राम जय जय राम' या नामस्मरणाचा गजर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेली रामधून अत्यंत सुश्राव्य आणि भावपूर्ण होती. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रभू श्रीरामांच्या जीवनातील 'मर्यादा पुरुषोत्तम' या संकल्पनेचे महत्त्व पटवून दिले. सत्यनिष्ठा, कर्तव्यपरायणता आणि मातृ-पितृभक्ती या गुणांचा आदर्श प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारावा, असे मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षीय मनोगतात सौ. राधिका गिरमे म्हणाल्या, "सण साजरे करणे हा केवळ उद्देश नसून, रामायणासारख्या महान ग्रंथातून विद्यार्थ्यांना शिस्त, त्याग आणि धैर्याचे संस्कार मिळावेत, हा आमचा प्रयत्न आहे." याचबरोबर शाळेच्या वतीने नऱ्हे परिसरातील राम मंदिरापर्यंत विद्यार्थ्यांची भव्य 'राम रॅली' काढण्यात आली, ज्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सांगता 'राम जन्म' पाळणा सोहळा व प्रसाद वितरणाने करण्यात आली. या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या सामूहिक सहभागामुळे हा सोहळा अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडला.

### RTE शिक्षणाची मर्यादा वाढवल्यास फायदा होईल : तानाजी कांबळे

पुणे (आरंभ पर्व) : सध्या RTE शिक्षण आठवीपर्यंत असून प्रशासनाच्या योजनेमुळे गोरगरीब सर्वसामान्यांच्या मुलांचे शिक्षण चांगल्या व दर्जेदार शाळांमध्ये होत आहे पण त्या पुढील शिक्षणाची वाट मात्र बिकट आहे कारण पुढील नववी व दहावीच्या पुढील शिक्षणासाठी मुलांनी कुठे जायचं ,हजारो ते लाखापर्यंत शैक्षणिक फी असणाऱ्या मोठ्या संस्थांमध्ये या मुलांना फी भरणे अशक्य असून शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन सर्वसामान्यांना शिक्षणाचा पुढील मार्ग मोकळा करून दिल्यास व पुढील शिक्षण दर्जेदार सर्व सुख सोयी असलेल्या संस्थेत होण्यास मदत होईल सर्वसामान्य पालकांना एवढी मोठी फी भरणे अशक्य असते सर्वसामान्य पालकाचे जीवन दररोजच्या रोजगारावर अवलंबून असते त्यामुळे आठवी पुढील शिक्षण मुले सोडून त्यांचं शैक्षणिक नुकसान होऊ शकतं प्रशासनाने दखल घेऊन सर्वसामान्य शिक्षणाचा मोफत हक्क द्यावा याबाबत शिक्षण संचालकांना निवेदन देणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते तानाजी कांबळे यांनी सांगितले.

### Galaxy A57 5G आणि A37 5G भारतात लवकरच; AI फीचर्सवर भर

गुरुग्राम (आरंभ पर्व) : सॅमसंग भारतात आपल्या नेक्स्ट-जनरेशन गॅलेक्सी A सिरीज स्मार्टफोन्स Galaxy A57 5G आणि Galaxy A37 5G लॉंच करण्याच्या तयारीत आहे. हे दोन्ही स्मार्टफोन्स पुढील आठवड्यात बाजारात येण्याची शक्यता आहे. या नवीन डिव्हाइसेसचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कमी प्रकाशातही स्पष्ट फोटो आणि व्हिडिओ कॅप्चर करण्याची प्रगत कॅमेरा क्षमता असेल. यासोबतच, सॅमसंगकडून 'ऑसम इंटेलिजन्स' नावाची नवीन AI-आधारित फीचर्सही देण्यात येणार असल्याची माहिती आहे. टिकाऊपणाच्या दृष्टीने Galaxy A57 5G आणि A37 5G हे IP68 रेटिंगसह येऊ शकतात, ज्यामुळे धूळ आणि पाण्यापासून संरक्षण मिळेल. तसेच, दीर्घकालीन सिक्युरिटी अपडेट्स आणि OS अपग्रेड्स ही सॅमसंगची खासियत या डिव्हाइसेसमध्येही कायम ठेवली जाणार आहे. डेटा सुरक्षिततेसाठी दोन्ही स्मार्टफोन्समध्ये हार्डवेअर-आधारित Samsung Knox Vault तंत्रज्ञानाचा समावेश असणार आहे. याशिवाय, अपग्रेडेड प्रोसेसर्स, Wi-Fi 6E आणि Bluetooth 6 यांसारख्या आधुनिक कनेक्टिव्हिटी फीचर्सची अपेक्षा आहे. सॅमसंगची गॅलेक्सी A सिरीज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय स्मार्टफोन सिरीजपैकी एक असून, देशात याची जवळपास 100 दशलक्ष युनिट्स विक्री झाली आहे. किफायतशीर दरात प्रीमियम फीचर्स देण्याच्या धोरणाचा भाग म्हणून हे नवीन स्मार्टफोन्स बाजारात सादर केले जाणार आहेत.

# रामनवमी मिरवणुकीत 'जनजागृतीचा संदेश'

***महिलांच्या सुरक्षेसाठी सरकार प्रतिष्ठानचा पुढाकार : लव्ह जिहादविरोधी जनजागृती रथाचे आकर्षण; धायरीत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग***




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सरकार प्रतिष्ठान आणि अखिल नरवीर तानाजी मालुसरे पथ श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने श्रीराम नवमी निमित्त आयोजित भव्य मिरवणुकीत यंदा सामाजिक जनजागृतीसोबत पारंपरिक संस्कृतीचा देखील उत्साहपूर्ण संगम पाहायला मिळाला. महिलांच्या सुरक्षेचा संदेश देत आणि युवक-युवतींमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात आले. या मिरवणुकीत मल्हार-बानू विवाह सोहळ्याचे सादरीकरण, परशुराम वाद्य पथक, आकर्षक श्रीराम रथ, कर्नाटकी देखावे, वारकरी भजनी मंडळ तसेच पारंपरिक बँड यांचा समावेश होता. या सर्व देखाव्यांमुळे मिरवणुकीला वेगळे आकर्षण प्राप्त झाले. यावेळी महिला संघटिका लक्ष्मी मंगेश कदम यांनी सांगितले की,"सरकार प्रतिष्ठान दरवर्षी सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवत असून यंदा दुसऱ्या वर्षीही मोठ्या उत्साहात रामनवमी मिरवणूक काढण्यात आली. समाजात घडणाऱ्या काही घटनांच्या पार्श्वभूमीवर युवतींमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले." मिरवणुकीत 'लव्ह जिहाद' विषयावर आधारित जनजागृती रथ हे प्रमुख आकर्षण ठरले. या रथातून सत्य घटनांवर आधारित देखावे सादर करून समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. "युवतींनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता धैर्याने व सजगतेने राहावे," असा संदेश त्यांनी दिला.

या मिरवणुकीत महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. धायरी परिसरातील विविध हिंदू संघटनांनी एकत्र येत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले. अन्याय करणाऱ्यांविरोधात कायदेशीर मार्गाने कारवाई करण्याची भूमिका संस्थेने घेतली असल्याचेही त्यांनी सांगितले. महिलांच्या सुरक्षेसाठी सरकार प्रतिष्ठान सदैव कटिबद्ध राहील, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

या मिरवणुकीचे आयोजन सचिन सोनवणे, अक्षय उंद्रे, गणेश खामकर, अजिंक्य जाधव, संदीप स्वामी आणि गणेश पासलकर यांनी केले. कार्यक्रमासाठी निमंत्रक म्हणून महिला संघटिका लक्ष्मी मंगेश कदम यांनी पुढाकार घेतला.

## धरणग्रस्त व दरडप्रवण गावांसाठी मंत्रालयात विशेष आढावा



**कोळवण (दै. आरंभ पर्व)**

भोर विधानसभा मतदारसंघातील भोर, राजगड व मुळशी तालुक्यांतील धरणग्रस्त, तसेच दरडप्रवण क्षेत्रातील गावांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुंबई मंत्रालयात विशेष आढावा बैठक पार पडली. या बैठकीत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी १९७६ पूर्वीच्या वीर, वरसगाव, पानशेत व भाटघर प्रकल्पांतील बाधित गावठाणांमधील नागरी सुविधांच्या कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले, अशी माहिती भोर-मुळशी-राजगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर मांडेकर यांनी दिली. या बैठकीत वीर, भाटघर, नीरा देवघर, गुंजवणी, पानशेत आणि वरसगाव प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या गावांमधील नागरी सुविधा, प्रलंबित प्रश्न आणि भोर, राजगड व मुळशी तालुक्यांतील दरडप्रवण भागातील गावांच्या सुरक्षिततेबाबत चर्चा करण्यात आली.

विशेषतः राजगड तालुक्यातील गुंजवणी, पानशेत व वरसगाव प्रकल्पबाधित सुमारे १८ गावांमधील अडचणी, तसेच कोदापूर ग्रामपंचायतीच्या गावांतील प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाली. तसेच भोर तालुक्यातील कोंढरी, धानवली आणि मुळशी तालुक्यातील घुटके व इतर दरडप्रवण गावांतील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना आणि संभाव्य स्थलांतराबाबत सकारात्मक चर्चा झाली.

## विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेची जागरूकता ९० टक्क्यांपर्यंत

### क्विक हील फाउंडेशनचा उपक्रम; ८० लाखांहून अधिक लोकांपर्यंत प्रभाव



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या CSR उपक्रमांतर्गत कार्यरत असलेल्या क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षण फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबतची जागरूकता जवळपास ९० टक्क्यांपर्यंत वाढल्याचे समोर आले आहे. या उपक्रमाचा प्रभाव देशभरातील ८० लाखांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचला आहे. फाउंडेशनने 'Cyber Shiksha for Cyber Suraksha: Future Proof 2025-26' हा पहिला प्रभाव मूल्यांकन अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालासाठी १०.४ लाख विद्यार्थ्यांचा सर्वेक्षण करण्यात आला असून, त्यातील २.१८ लाख प्रतिसादांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. हा सर्वे महाराष्ट्र व कर्नाटकातील ३२ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला. अहवालानुसार, कार्यक्रमानंतर सायबर जागरूकतेत लक्षणीय वाढ झाली असून, इयत्ता ५ ते ७ मधील विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता ४३ टक्क्यांवरून ८९ टक्क्यांपर्यंत, इयत्ता ८ ते १० मध्ये ४९ टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ४३ टक्क्यांवरून ९० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. तसेच १० पैकी ८ विद्यार्थ्यांनी सुरक्षित ऑनलाइन वर्तन स्वीकारण्याची तयारी दर्शवली आहे. सुरक्षित डिजिटल सवयींच्या अंगीकारातही वाढ दिसून आली असून, इयत्ता ५ ते ७ मध्ये ३९ टक्क्यांवरून ८४ टक्के, इयत्ता ८ ते १० मध्ये ३९ टक्क्यांवरून ८२ टक्के, तर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये २६ टक्क्यांवरून ८९ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. डिजिटल लवचिकतेतही मोठी सुधारणा झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना 'सायबर वॉरियर्स' म्हणून तयार करण्यात येत असून, Earn & Learn मॉडेलद्वारे ते इतरांमध्ये सायबर सुरक्षा जागरूकता निर्माण करतात. तसेच नेतृत्व, संवादकौशल्य, टीमवर्क आणि प्रकल्प व्यवस्थापन यांसारख्या कौशल्यांचा विकासही केला जातो. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी सांगितले की, "या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाबरोबरच त्यांच्या वर्तनामध्येही सकारात्मक बदल झाला आहे. सुरक्षित डिजिटल भारत घडवण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे."

उपक्रमांतर्गत ५,१६९ जागरूकता सत्रांद्वारे ३६ शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यक्रम राबविण्यात आला असून, या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्यात आला आहे.

## ट्रम्प यांच्या वक्तव्यांचा जागतिक परिणाम आणि

# भारतासमोरील वाढती चिंता

**मा. श्री. लक्ष्मण साबळे, निवासी संपादक**



**(दै. आरंभ पर्व)**

सध्या सगळ्यात जास्त चर्चेला येणारे नेते म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प.. सध्याची युद्धजन्य परिस्थिती मध्ये अमेरिकेचे जास्त योगदान आहे.खरं आहे पण त्यांचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बजावलेली भूमिका ही जगाला तिसऱ्या महायुद्धाकडे घेऊन जाणारी दिसत आहे. यांच्याबद्दल बोलणे म्हणजे लहान तोंडी मोठा घास होईल. आज जग आणि देश ज्या गंभीर परिस्थितीतून जात आहे, ते पाहता "गड्या आवर!" असेच ठामपणे म्हणावेसे वाटते. नाहीतर अनेक लोकं उपाशी मरतील. सध्या एक गोष्ट स्पष्ट दिसते—काहीही उठायचे आणि माध्यमांसमोर बरळायचे, यामुळेच आज जग तणावात आले आहे. मोठ्या पदावर असलेल्या नेत्यांचे प्रत्येक वक्तव्य हे केवळ बोलणे नसते, तर त्याचा परिणाम संपूर्ण जगावर होतो. अशा वेळी संयम, जबाबदारी आणि विचारपूर्वक भूमिका घेणे अत्यंत आवश्यक असते. पण जेव्हा आक्रमक आणि वादग्रस्त वक्तव्ये केली जातात, तेव्हा त्यातून आंतरराष्ट्रीय तणाव वाढण्याची शक्यता अधिक असते.

ट्रम्प यांच्या भूमिकेमुळे जागतिक स्तरावर अस्थिरता वाढताना दिसत आहे. विशेषतः मध्यपूर्वेतील तणाव आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे तेलाच्या किमती सातत्याने वाढत आहेत. भारत हा मोठ्या प्रमाणावर तेल आयात करणारा देश असल्यामुळे याचा थेट परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर होतो. इंधन महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो, उत्पादन खर्च वाढतो आणि शेवटी सर्वसामान्य नागरिकाला महागाईचा फटका बसतो. अन्नधान्यापासून ते दैनंदिन गरजेच्या वस्तूंपर्यंत सर्व काही महाग होते.

याशिवाय, अमेरिकेच्या 'America First' धोरणामुळे जागतिक व्यापारावरही परिणाम झाला आहे. अनेक देशांवर निर्बंध, वाढीव कर आणि कठोर नियम यामुळे भारताच्या निर्यातीवर दबाव येत आहे. लघुउद्योग, वस्त्रोद्योग आणि इतर क्षेत्रांवर याचा परिणाम होत असून रोजगाराच्या संधी कमी होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे तरुण वर्गासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

तसेच, अमेरिकेतील कडक व्हिसा धोरणांमुळे भारतीय विद्यार्थ्यांना आणि आयटी क्षेत्रातील कामगारांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांची स्वप्ने अपूर्ण राहण्याची वेळ येत आहे. यामुळे भारतातील कौशल्यवान मनुष्यबळावरही परिणाम होऊ शकतो.

जागतिक अस्थिरतेचा आणखी एक मोठा परिणाम म्हणजे गुंतवणुकीत घट. परकीय गुंतवणूक कमी झाली तर देशाच्या आर्थिक वाढीवर परिणाम होतो. उद्योगधंदे मंदावतात आणि त्याचा परिणाम रोजगारावर होतो. परिणामी, सामान्य माणसाचे जीवन अधिक कठीण होते.

ही सर्व परिस्थिती पाहता भारताने आता अधिक सजग आणि सक्षम होण्याची गरज आहे. स्वदेशी उत्पादन वाढवणे, ऊर्जा स्वावलंबनावर भर देणे, नवीन बाजारपेठा शोधणे आणि आर्थिक धोरणे मजबूत करणे अत्यंत गरजेचे आहे. जागतिक घडामोडींवर अवलंबून न राहता स्वतःची ताकद वाढवणे हाच एकमेव मार्ग आहे.

आजची परिस्थिती ही केवळ एक इशारा नाही, तर एक गंभीर चेतावणी आहे. मोठ्या नेत्यांच्या एका वक्तव्यामुळे जग हलते आणि त्याचा परिणाम थेट सामान्य माणसाच्या जीवनावर होतो. त्यामुळेच पुन्हा एकदा स्पष्टपणे सांगावेसे वाटते", नाहीतर ही अस्थिरता भविष्यात अधिक भीषण रूप धारण करू शकते.






दैनिक **आरंभपर्व**

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६










## थोडक्यात पण महत्वाचे




### ‘बिलियनेअर’मध्ये अर्जुन रामपालची दमदार एंट्री; नवी भव्य सीरिज

मुंबई (आरंभ पर्व) : Amazon MX Player ने आपल्या आगामी ओरिजिनल सीरिज ‘बिलियनेअर’ची घोषणा केली असून, या सीरिजमध्ये अभिनेता अर्जुन रामपाल प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. ‘कनेक्टेड वर्ल्ड्स’ या इव्हेंटमध्ये या प्रोजेक्टचे अनावरण करण्यात आले. प्रसिद्ध दिग्दर्शक हंसल मेहता आणि रॉबी ग्रेवाल या सीरिजचे दिग्दर्शन करणार असून, अनुभव चोप्रा आणि शांतनू सागरा यांनी लेखन केले आहे. प्रभलीन संधू यांच्या ऑलमायटी मोशन पिक्चर या बॅनरअंतर्गत या सीरिजची निर्मिती होत आहे. ‘बिलियनेअर’ ही सीरिज बदलत्या भारताच्या पार्श्वभूमीवर एका प्रभावशाली उद्योगपतीच्या प्रवासाची कथा मांडते. सत्ता, महत्त्वाकांक्षा आणि यशाची किंमत यांचा वेध घेणारी ही कथा प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी ठरणार आहे. Amazon MX Player चे कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद म्हणाले, “ही सीरिज आमच्या ओरिजिनल कंटेंटच्या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. हंसल मेहता आणि रॉबी ग्रेवाल यांची सर्जनशील दृष्टी आणि अर्जुन रामपालची प्रभावी भूमिका यामुळे ‘बिलियनेअर’ विशेष ठरणार आहे.” अर्जुन रामपाल यांनीही या प्रोजेक्टबद्दल उत्साह व्यक्त करत सांगितले, “अशा प्रकारची भूमिका क्वचितच मिळते. या भूमिकेसाठी पूर्ण तयारी करून प्रेक्षकांसमोर दमदार सादरीकरण करण्यासाठी मी सज्ज आहे.” ‘बिलियनेअर’ही सीरिज लवकरच Amazon MX Player वर मोफत स्ट्रीम होणार असून, मोबाइल, स्मार्ट टीव्ही आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध असेल.

### ‘डॅम्प प्रूफ’साठी रणबीर-सौरभची नवी मोहीम; एशियन पेंट्सचा भर




पुणे (आरंभ पर्व) : भारतीय घरांना मुसळधार पाऊस आणि कडक उन्हाळा या दोन टोकाच्या ऋतूंचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर एशियन पेंट्सने ‘डॅम्प प्रूफ’ या वॉटरप्रूफिंग सोल्यूशनसाठी नवीन जाहिरात मोहीम सादर केली असून, त्यात अभिनेता रणबीर कपूर आणि सौरभ शुक्ला प्रमुख भूमिकेत आहेत. ‘साधेसुधे वॉटरप्रूफिंग नाही, एशियन पेंट्स डॅम्प प्रूफ वापरा’ हा संदेश देणाऱ्या या मोहिमेद्वारे कंपनीने घरमालकांना दर्जेदार आणि दीर्घकालीन संरक्षणाचा पर्याय निवडण्याचे आवाहन केले आहे. गेल्या १३ वर्षांपासून ‘डॅम्प प्रूफ’ उत्पादन घरांना पाणी झिरपण्यापासून आणि हवामानाच्या तीव्रतेपासून संरक्षण देत असल्याचा कंपनीचा दावा आहे. या उत्पादनामध्ये जाड जलरोधक थरासोबत प्रगत उष्णता-परावर्ती कोटिंगचा समावेश असून, यामुळे पृष्ठभागाचे तापमान सुमारे १० अंश सेल्सियसने कमी होते. त्यामुळे उन्हाळ्यात घर अधिक थंड राहण्यास मदत होते. नवीन जाहिरात चित्रपटात विनोदी आणि खेळीमेळीच्या शैलीत घरांतील सामान्य समस्या — गळती, उकाडा यांचा वेध घेत, त्यावर ‘डॅम्प प्रूफ’ हा प्रभावी उपाय असल्याचे दाखवण्यात आले आहे. ‘कव्वाली’ शैलीतील सादरीकरणामुळे ही मोहीम अधिक आकर्षक बनली आहे. एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सिंगल म्हणाले, “डॅम्प प्रूफ हे केवळ गळती रोखणारे उत्पादन नाही, तर उष्णता कमी करून घर अधिक आरामदायी बनवते. १० वर्षांची वॉटरप्रूफिंग हमी देणारे हे समाधान भारतीय घरांसाठी विश्वासार्ह पर्याय आहे.” ही मोहीम टेलिव्हिजन, डिजिटल, ओटीटी प्लॅटफॉर्म्स, सोशल मीडिया आणि चित्रपटगृहांमध्ये तसेच क्रिकेट सामन्यांदरम्यान प्रदर्शित केली जाणार आहे.



### मिशलिनचा विस्तार; ३ नवीन टायर्स एण्ड सर्व्हिसेस स्टोअर्सचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : जगप्रसिद्ध टायर निर्माता कंपनी मिशलिन इंडियाने पुण्यात आपल्या विस्ताराला गती देत हडपसर, कॅम्प आणि चिंचवड येथे तीन नवीन ‘मिशलिन टायर्स एण्ड सर्व्हिसेस’ (MTS) स्टोअर्स सुरू केले आहेत. दर्शन टायर्सच्या सहकार्याने सुरू झालेल्या या केंद्रांचे उद्घाटन नुकतेच पार पडले. या विस्तारामुळे पुण्यात मिशलिनची उपस्थिती अधिक भक्कम झाली असून, राज्यभरातील पुढील विस्ताराचा मार्गही मोकळा झाला आहे. ग्राहकांना प्रीमियम सेवा सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही स्टोअर्स प्रमुख बाजारपेठांमध्ये उभारण्यात आली आहेत. हडपसर आणि चिंचवड येथील स्टोअर्स सुमारे २,५०० चौ.फुट तर कॅम्प येथील स्टोअर १,५०० चौ.फुट जागेत सुसज्ज करण्यात आले आहे. या अत्याधुनिक केंद्रांमध्ये प्रीमियम कार टायर्सची संपूर्ण श्रेणी उपलब्ध असून व्हील अलाइनमेंट, बॅलन्सिंग, टायर फिटिंग, रोटेशन, दुरुस्ती आणि टायर बदल यांसारख्या सेवा आधुनिक यंत्रसामग्रीद्वारे दिल्या जाणार आहेत.

# पदक विजेत्या कुस्तीपटूंना सरकारी नोकरी द्या

## राष्ट्रीय खेळाडू पै. राहुल मुरलीधर मते



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत विविध वजन गटात चार, पाच किंवा सहा वेळा सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके जिंकलेल्या पैलवानांना किमान वर्ग-३ ची सरकारी नोकरी द्यावी, अशी मागणी राहुल मते यांनी केली आहे. महाराष्ट्रातील अनेक गरीब कुटुंबातील शेकडो महाराष्ट्र चॅम्पियन आजही नोकरीपासून वंचित असून शासनाने त्यांच्या भविष्याचा गांभीर्याने विचार करावा, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील उत्कृष्ट पैलवानांची जिल्हा चाचण्यांद्वारे निवड करून दरवर्षी ‘महाराष्ट्र केसरी’ हा किताब दिला जातो. मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर या मानाच्या किताबाचे महत्त्व काही घटकांमुळे कमी होत असल्याची खंत मते यांनी व्यक्त केली. राज्यातील विविध कुस्ती संघटनांतील पदाधिकाऱ्यांमध्ये पदांबाबत स्पर्धा आणि मतभेद वाढत असल्याने कुस्ती क्षेत्रात वाद निर्माण होत आहेत. अध्यक्षपद, सरचिटणीसपद किंवा इतर मोठ्या पदांवर कोणाला संधी मिळावी, यावरून संघटनांमध्ये मतभेद दिसून येत आहेत, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, इतर राज्यांमध्ये आंतरराष्ट्रीय नियमानुसार प्रशिक्षण, आधुनिक सुविधा आणि दर्जेदार प्रशिक्षकांच्या माध्यमातून कुस्तीपटू तयार केले जातात. ऑलिंपिक पदक जिंकण्याच्या दृष्टिने तेथे नियोजन केले जाते. मात्र महाराष्ट्रात प्रामुख्याने महाराष्ट्र केसरी किताबाभोवतीच स्पर्धा फिरताना दिसत असल्याची टीकाही त्यांनी केली.

स्पर्धेत केवळ एकाच विजेत्याला मोठी बक्षिसे देऊन गाजावाजा केला जातो; मात्र इतर वजन गटातील विजयी पैलवानांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. राज्य व राष्ट्रीय स्तरावर पदके जिंकूनही अनेक पैलवानांना शासकीय नोकरी, प्रायोजक किंवा अपेक्षित बक्षिसे मिळत नाहीत. त्यामुळे या युवा पैलवानांचे भविष्य अंधारात जात असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. सध्या तीन वेळा महाराष्ट्र केसरी होणाऱ्या पैलवानांना पोलिस उपअधीक्षक पद दिले जाते, तर दुहेरी महाराष्ट्र केसरी होणाऱ्यांना क्रीडा अधिकारी पद मिळते. मात्र अनेक गुणवंत पैलवान नोकरीपासून वंचित राहतात, अशी खंत मते यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र केसरी किताब जिंकल्यानंतर त्या पैलवानांच्या पुढील कारकिर्दीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. राष्ट्रीय, राष्ट्रकुल, आशियाई आणि ऑलिंपिक स्पर्धांसाठी त्यांना सक्षम बनविण्याचे नियोजन व्हावे. महाराष्ट्रातून ऑलिंपिक पदक विजेता कुस्तीपटू पुन्हा एकदा घडवण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असेही त्यांनी सांगितले.

कुस्तीच्या उज्ज्वल भविष्यासाठी महाराष्ट्रात एकच अधिकृत कुस्ती संघटना असावी. त्या माध्यमातून शेतकरी कुटुंबातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उदयोन्मुख पैलवानांचा विकास करण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे राहूल मते यांनी नमूद केले.


## धायरी गावचे ग्रामदैवत श्री. कालभैरवनाथाची यात्रा उत्साहात

### निकाली कुस्त्यांच्या जंगी आखाड्याचे नियोजन

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्त्यावरील धायरी गावचे ग्रामदैवत श्री. काळभैरवनाथ देवाची यात्रा उत्साहात पार पडली. उत्सवनिमित्त निकाली कुस्त्यांच्या जंगी आखाड्याचे नियोजन करण्यात आले .क्रमांक एक साठी कै. सोपानदादा पोकळे यांच्या स्मरणार्थ अनिल पोकळे व सुनील पोकळे यांच्यावतीने चांदीची गदा व रोख रक्कम ठेवण्यात आली. यावेळी मानाच्या चांदीच्या गदेसाठी महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुध्द उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे यांच्यात अटीतटीची लढत झाली . दीड दोन तास चाललेल्या या कुस्तीमध्ये दोन्ही पैलवांनापैकी कोणीही विजयी न झाल्याने अखेरची कुस्ती बरोबरीत सोडवत इनामाची रक्कम दोघांमध्ये दिली. रात्री १२ वाजेपर्यंत चाललेल्या या कुस्तिआखाड्यात ५० हून अधिक कुस्ती सामने निकाली पार पडले. सर्व विजेत्या पैलवानांना रोख रक्कम पारितोषिक देण्यात आले. किशोर पोकळे, उत्सव समितीचे अध्यक्ष तुषार पोकळे, उपाध्यक्ष शिवराज चव्हाण, अनिल पोकळे, राजेश पोकळे, रोहित लायगुडे, सोमेश्वर वाकचौरे, कृष्णा पोकळे, बापूसाहेब पोकळे आदींसह ग्रामस्थ तरुण कार्यकर्त्यांनी आखाड्याचे संयोजन केले. मंगळवारी २४ मार्च रोजी श्री काळभैरवनाथ देवस्थानच्या उत्सवास हजारो भाविकांच्या उपस्थितीत पारंपारिक रिवाजात सुरुवात झाली. देवस्थान , उत्सव समीतीचे पदाधिकारी व ग्रामस्थांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. महापुजा व आरती होऊन उत्सवास प्रारंभ झाला.

**दर्शनासाठी सकाळ पासूनच भाविकांनी अलोट गर्दी केली होती. मंदिराचा परिसर भाविकांनी फुलून गेला. देवस्थानचे अध्यक्ष श्रीरंग चव्हाण पाटील, उपाध्यक्ष सुनिल पोकळे, सचिव पंढरीनाथ पोकळे, खजिनदार गुलाब पोकळे पद्माकर लायगुडे किशोर आदींसह सर्व धायरी ग्रामस्थांनी, देवस्थान ट्रस्ट व उत्सव समितीने यावेळी उत्कृष्ट नियोजन केले.**



## ‘मर्सी’ची झलक २७ मार्चला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

निष्क्रिय इच्छामृत्यू या संवेदनशील विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेता ‘मर्सी’ या चित्रपटाची पहिली अधिकृत झलक 27 मार्चपासून चित्रपटगृहांमध्ये दाखवली जाणार आहे. ही झलक ‘धुरंधर: द रिवेंज’ या चित्रपटासोबत प्रदर्शित केली जाणार आहे. ‘मर्सी’ हा चित्रपट एका कुटुंबाच्या भावनिक प्रवासाची कथा मांडतो. जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावर येणाऱ्या कठीण परिस्थितीत कुटुंबाला भावनिक आणि कायदेशीर द्वंद्वाचा सामना कसा करावा लागतो, याचे वास्तववादी चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. या चित्रपटात आदिल हुसैन, राज वासुदेवा आणि निहारिका रायजादा यांच्या प्रमुख भूमिका असून, अपर्णा घोषाल आणि कुणाल भान यांनीही प्रभावी कामगिरी साकारली आहे. चित्रपटाबद्दल बोलताना राज वासुदेवा म्हणाले, “मर्सी माझ्यासाठी अत्यंत खास आहे. ही कथा प्रेम, जबाबदारी आणि कुटुंबाच्या ताकदीची आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेली प्रशंसा आनंददायी आहे.”




## राजगुरुनगर बँकेच्या उपाध्यक्षपदी रामदास धनवटे

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर येथील राजगुरुनगर सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी रामदास धनवटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित उपाध्यक्ष रामदास धनवटे यांचा सन्मान बँकेच्या संचालकांच्या वतीने करण्यात आला. या निवड प्रक्रीयेच्या वेळी राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, जेष्ठ विद्यमान संचालक, माजी अध्यक्ष किरण आहेर, गणेश थिगळे,अविनाश कहाणे राहुल तांबे, दिनेश ओसवाल, समीर आहेर, विजया शिंदे, दत्ता भेगडे, विनायक घुमटकर, अश्विनी पाचारणे, राजेंद्र सांडभोर, विजय डोळस, अरुण थिगळे, सचिन मांजरे आणि राजेंद्र वाळुंज, मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे, दिलीप मलघे आदी उपस्थित होते.



## विवोचे Y21 5G आणि Y11 5G लाँच; 6500mAh बॅटरी व मिलिटरी-ग्रेड टिकाऊपणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विवो इंडियाने आपल्या Y सीरिजचा विस्तार करत नवीन Vivo Y21 5G आणि Vivo Y11 5G हे स्मार्टफोन्स भारतीय बाजारात सादर केले आहेत. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, मजबूत टिकाऊपणा आणि 5G परफॉर्मन्स लक्षात घेऊन हे दोन्ही डिव्हाइस डिझाइन करण्यात आले आहेत. या स्मार्टफोन्समध्ये 6500mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली असून, दिवसभर वापरासाठी ते सक्षम आहेत. कंपनीच्या माहितीनुसार, या बॅटरीवर 48 तासांपर्यंत व्हिडिओ प्लेबॅक, 80 तासांपर्यंत म्युझिक प्लेबॅक आणि 33 तासांपर्यंत सोशल मीडिया वापर शक्य आहे. टिकाऊपणाच्या दृष्टीने दोन्ही डिव्हाइसेस SGS 5-स्टार ड्रॉप रेसिस्टन्स आणि मिलिटरी-ग्रेड सर्टिफिकेशनसह येतात. IP65 रेटिंगमुळे धूळ आणि पाण्यापासूनही संरक्षण मिळते. परफॉर्मन्ससाठी MediaTek Dimensity 6300 प्रोसेसर देण्यात आला असून, 5G कनेक्टिव्हिटीसह स्थिर आणि स्मूथ अनुभव मिळतो. OriginOS 6 मुळे वापरकर्ता अनुभव अधिक सुलभ आणि जलद होतो. दोन्ही स्मार्टफोन्समध्ये 6.74-इंच HD+ डिस्प्ले आणि 120Hz रिफ्रेश रेट देण्यात आला आहे, ज्यामुळे स्क्रोलिंग आणि व्हिज्युअल्स अधिक स्मूथ दिसतात. 1200 nits ब्राइटनेस आणि TÜV Rheinland लो ब्लू लाईट सर्टिफिकेशनमुळे डोळ्यांना आरामदायी अनुभव मिळतो.




**: किंमत :**
**Vivo Y21 5G – ₹18,999 ते ₹22,999 (व्हेरिएंटनुसार)**
**Vivo Y11 5G – ₹14,999 ते ₹16,999**

चार्जिंगच्या बाबतीत Vivo Y21 5G मध्ये 44W फास्ट चार्जिंग तर Y11 5G मध्ये 15W चार्जिंग सपोर्ट आहे. याशिवाय, दोन्ही डिव्हाइसेसमध्ये 5 वर्षांची बॅटरी हेल्थ गॅरंटी देण्यात आली आहे. दोन्ही स्मार्टफोन्स Vivo ई-स्टोअर, Flipkart आणि अधिकृत रिटेल स्टोअर्सवर उपलब्ध आहेत. ग्राहकांना कॅशबॅक, झिरो डाउन पेमेंट आणि Jio OTT फायदे यांसारख्या लॉन्च ऑफर्सचाही लाभ मिळणार आहे.

## शाश्वत भविष्याला चालना देण्यासाठी जॅक्सन ग्रुपची सौरव गांगुलीसोबत भागीदारी

### *नेतृत्व अधिक भक्कम करण्यासाठी आणि शाश्वत विकासाला गती देण्यासाठी पहिल्या ब्रँड ॲम्बेसेडरची नियुक्ती*

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीची ऊर्जा आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील कंपनी जॅक्सन ग्रुपने आज भारताच्या क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि प्रख्यात नेतृत्व सौरव गांगुली यांच्यासोबत धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. भारत वेगाने आपल्या अक्षय ऊर्जेच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या दिशेने पुढे जात असताना ही भागीदारी झाली आहे. नाविन्य, व्याप्ती आणि शाश्वत उपायांद्वारे देशाच्या ऊर्जा संक्रमणाला चालना देण्याच्या जॅक्सनच्या कटिबद्धतेला यामुळे अधिक बळकटी मिळते.




आठ दशकांहून अधिक काळाचा वारसा असलेल्या जॅक्सन ग्रुपने नेहमीच विश्वास, लवचिकता आणि भविष्याचा वेध घेणाऱ्या नाविन्यपूर्णतेला प्राधान्य दिले आहे. गांगुली यांचे परिवर्तनशील नेतृत्व आणि नवे मापदंड प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या क्षमतेतून प्रेरणा घेत, कंपनीचे उद्दिष्ट भविष्यवेधी ऊर्जा आणि पायाभूत सुविधांचे उपाय स्पष्टपणे आणि उत्कृष्टपणे अंमलात आणणारा एक विश्वासार्ह भागीदार म्हणून आपले स्थान अधिक मजबूत करणे हे आहे. या भागीदारीचा एक भाग म्हणून, सौरव गांगुली जॅक्सन ग्रुपच्या प्रमुख ब्रँड मोहिमा आणि धोरणात्मक उपक्रमांचे प्रतिनिधित्व करतील, तसेच अधिक स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा परिसंस्था निर्माण करण्याच्या कंपनीच्या दृष्टिकोनाचा विस्तार करतील. या भागीदारीबद्दल बोलताना, जॅक्सन ग्रुपचे अध्यक्ष श्री. समीर गुप्ता म्हणाले, "जॅक्सन कुटुंबात 'दादा'चे स्वागत करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. सौरव गांगुली हे नेतृत्व, चिकाटी आणि उत्कृष्ट कामगिरीचे प्रतीक आहेत - हीच मूल्ये आमच्यातही रुजलेली आहेत. नेहमी पुढे राहण्याच्या आणि सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या आमच्या समान विचारधारेचे हे भागीदारी एक प्रतिबिंब आहे. त्यांच्या विश्वासार्हतेमुळे, आम्हाला खात्री आहे की ही भागीदारी आमचा ब्रँड मजबूत करेल आणि भारतभर तसेच जागतिक स्तरावर आमच्या शाश्वत उपायांचा अवलंब करण्यास गती देईल." ते पुढे म्हणाले, "आमची प्रगती मजबूत नेतृत्वावर आधारलेली आहे, ज्याला आमचे उपाध्यक्ष श्री. संदीप गुप्ता, जॅक्सन ग्रीनचे उपाध्यक्ष आणि ग्लोबल सीईओ श्री. बिकेश ओग्रा, आणि ग्रुपला पुढे नेणाऱ्या नव्या पिढीची खंबीर साथ आहे."

या भागीदारीवर भाष्य करताना श्री. सौरव गांगुली म्हणाले, “वितरित वीज, सौर ऊर्जा, ग्रीन मॉलिक्यूल्स आणि पायाभूत सुविधा - वीज, मेट्रो, नागरी आणि पाणी या संपूर्ण मूल्य साखळीवर जॅक्सनचा दृष्टिकोन अत्यंत वेळेवर आणि प्रभावी आहे. भारताच्या ऊर्जा संक्रमण आणि हरित भविष्यासाठी अर्थपूर्ण योगदान देणाऱ्या ब्रँडशी जोडले जाण्यासाठी मी खूप उत्सुक आहे.” हा उपक्रम जॅक्सनच्या उत्पादन, प्रकल्प विकास, EPC आणि O&M सेवांपर्यंत विस्तारलेल्या अद्वितीय एकात्मिक व्यवसाय मॉडेलला अधिक बळकटी देतो. आपल्या विकास धोरणाशी सुसंगत राहून, कंपनी दीर्घकालीन शाश्वततेसाठी लोक आणि तंत्रज्ञान यावर लक्ष केंद्रित करत आहे. आठ दशकांहून अधिक काळाचा वारसा असलेला जॅक्सन ग्रुप, नाविन्य, ग्राहकांना प्राधान्य देणारा दृष्टिकोन आणि स्वच्छ भविष्य घडवण्याच्या दृढ संकल्पाच्या मार्गदर्शनाखाली, भारताच्या विकसित होत असलेल्या ऊर्जा आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.




# हर्षवर्धन सदगीरला शरद पवारांकडून १२ लाखांची शिष्यवृत्ती

## काका पवारांच्या तालमीस ५० लाखांची मदत



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

डबल महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीर याला खासदार शरद पवार यांच्या हस्ते ₹12 लाखांची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली असून, काका पवार यांच्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलासाठी ₹50 लाखांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. मुंबई येथे झालेल्या भेटीत हा गौरव करण्यात आला. या वेळी अर्जुन पुरस्कार विजेते काका पवार, उद्योजक मोहसीन बागवान, कुस्ती प्रशिक्षक शिवाजी कोळी, महाराष्ट्र चॅम्पियन पृथ्वीराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. हर्षवर्धन सदगीर याच्या कामगिरीचे कौतुक करत शरद पवार यांनी पुढील दोन वर्षांसाठी दरमहा ₹50 हजार प्रमाणे एकूण ₹12 लाखांची शिष्यवृत्ती दिली.

ही मदत त्याच्या ऑलिम्पिकच्या तयारीसाठी महत्त्वाची ठरणार आहे. काका पवार यांच्या तालमीत प्रशिक्षण घेत असलेल्या हर्षवर्धनसह 11 मल्लांनी विविध स्पर्धांमध्ये पदके जिंकली आहेत. या यशस्वी कामगिरीच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलासाठी ₹50 लाखांची मदत देण्यात आली. या मदतीबद्दल काका पवार यांनी शरद पवार यांचे आभार मानताना सांगितले, "शरद पवार हे खेळाडूंसाठी नेहमीच आधारस्तंभ राहिले आहेत. त्यांनी केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष धनादेश देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे." हर्षवर्धन सदगीर म्हणाला, "गुरू काका पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मी पुन्हा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत उतरणार आहे. मात्र, माझे अंतिम ध्येय ऑलिम्पिकमध्ये खेळण्याचे आहे. शरद पवार यांची मदत मला नक्कीच प्रेरणा देणारी आहे."

### नोकरीचेही आश्वासन

**दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही काका पवार व हर्षवर्धन सदगीर यांनी भेट घेतली. येत्या अधिवेशनात नाशिक महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती काका पवार यांनी दिली.**

### नोकरीचे आश्वासन

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हर्षवर्धन सदगीरला नाशिक महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आश्वासन दिले असून, खेळाडूंच्या भविष्याबाबत सकारात्मक पाऊल उचलल्याचे मानले जात आहे.**




## एअरबीएनबीने 'इव्हेंट टुरिझम' केंद्र म्हणून होत असलेली वाढ केली अधोरेखित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एअरबीएनबीचा अलीकडेच प्रकाशित झालेला अहवाल 'अनलॉकिंग महाराष्ट्र इव्हेंट इकॉनॉमीः पॉवरिंग टुरिझम अँड लोकल कम्युनिटीज' मध्ये अधोरेखित करण्यात आले की प्रवासाला वाढत्या प्रमाणात अनुभवांमुळे चालना मिळत असल्याने महोत्सव, क्रीडा कार्यक्रम आणि सांस्कृतिक उत्सव महाराष्ट्रभर पर्यटनाची मागणी आणि पर्यटकांच्या खर्चाला वेग देत आहेत. त्यामुळे महाराष्ट्र भारतातील कार्यक्रमकेंद्री प्रवासाचे प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यभरात मोठ्या प्रमाणावरील उपक्रमांमुळे पर्यटकांमध्ये मोठी वाढ होऊ लागली आहे. २०२३ मधील विश्वचषक सामन्यांदरम्यान, महाराष्ट्रात राहिलेल्या पाहुण्यांमध्ये वार्षिक स्तरावर ५० टक्के वाढ झाली. त्याचबरोबर सामान्याच्या तारखांदरम्यान पर्यटकांच्या चेक-इनमध्ये ७५ टक्के वाढ झाली. तसेच जानेवारी २०२५ मध्ये मुंबईतील कोल्डप्लेच्या कार्यक्रमादरम्यान बुकिंगमध्ये १०० टक्के वाढ झाली आणि मैफिलीच्या तारखांदरम्यान पाहुण्यांच्या संख्येत १७० टक्के वाढ झाली. पर्यटकांनी या क्षणांचे ट्रिप्समध्ये रूपांतर केले. हा कल पुढे लोलापलूझा इंडिया २०२६ सारख्या उत्सवांमध्ये प्रतिबिंबित झाला, जिथे मुंबईतील बुकिंगमध्ये वार्षिक स्तरावर ५० पेक्षा जास्त वाढ झाली आहे. जानेवारीमधील सर्व बुकिंगपैकी ८० टक्यांपेक्षा जास्त बुकिंग महोत्सवाच्या आठवड्यात होते.

## मुंबईत 'सुपर मारिओ'ची धमाल; जेमिमा रॉड्रिग्जच्या नेतृत्वाखाली रंगली अनोखी परेड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'द सुपर मारिओ गॅलेक्सी मुव्ही'च्या प्रदर्शनापूर्वी मुंबईत अनोख्या 'मारिओ मुंबई परेड'चे आयोजन करण्यात आले. क्रिकेटपटू जेमिमा रॉड्रिग्ज यांच्या नेतृत्वाखाली १०० हून अधिक चाहत्यांनी या रंगतदार परेडमध्ये सहभाग घेतला.

युनिव्हर्सल पिक्चर्स इंडियातर्फे (वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीद्वारे वितरित) आयोजित या परेडने मुंबईच्या रस्त्यांना मारिओच्या रंगांनी सजवले. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते आझाद मैदान असा हा जल्लोषी प्रवास झाला. लाल रंगाचे मारिओ-थीम टी-शर्ट घालून सहभागी झालेले चाहते, उत्साह आणि रंगतदार वातावरणामुळे हा सोहळा विशेष ठरला.



या कार्यक्रमाचे नेतृत्व करताना जेमिमा रॉड्रिग्ज म्हणाल्या, "मारिओ डेचा भाग होणे माझ्यासाठी नॉस्टॅल्जिक अनुभव होता. लहानपणी मारिओ पाहत मोठं झालो, आणि आज तोच उत्साह चाहत्यांमध्ये पाहून खूप आनंद झाला." आझाद मैदानात झालेल्या समारोपात रेड कार्पेट, विविध गेम्स आणि संवादात्मक उपक्रमांनी वातावरण रंगले. अनेक चाहते मारिओच्या पारंपरिक लाल-निळ्या वेशात सहभागी झाले होते.

या कार्यक्रमात चित्रपटाचे हिंदी व्हॉईस-ओव्हर कलाकार शानूर मिर्झा (मारिओ) आणि अंकुर जावेरी (लुइगी) यांची उपस्थितीही विशेष ठरली. चाहत्यांना आपल्या आवडत्या पात्रांमागील आवाजांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी मिळाली. वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीचे उपाध्यक्ष डेन्झिल डायस म्हणाले, "मारिओसारख्या पात्रांमुळे लोक एकत्र येतात. क्रिकेट किंवा चित्रपटासारखीच ही भावना सर्वांना जोडणारी आहे."

कार्यक्रमातील मुख्य आकर्षण म्हणजे जेमिमाचा 'मिस्ट्री बॉक्स'मधून भव्य प्रवेश आणि योशी-थीम अंड्यांमधून क्रिकेट चेंडूंचे वितरण. यामुळे कार्यक्रमात उत्साहाची आणखी भर पडली. 'द सुपर मारिओ गॅलेक्सी मुव्ही' ३ एप्रिल २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असून, या परेडमुळे चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.




## मास्टर्स इन बिल्डिंग एनर्जी परफॉर्मन्स अभ्यासक्रमासाठी अर्ज आमंत्रित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेप्ट युनिव्हर्सिटीच्या तंत्रज्ञान विद्याशाखेमार्फत उपलब्ध असलेल्या 'मास्टर्स इन बिल्डिंग एनर्जी परफॉर्मन्स (एमबीईपी)' या दोन वर्षांच्या, पूर्ण-वेळ पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेशासाठी विद्यापीठाने अर्ज मागविले आहेत. अर्ज स्वीकारण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत आहे. एमबीईपी कार्यक्रम हा काटेकोर वातावरणनिर्मिती (सिम्युलेशन), प्रयोग आणि प्रणालींच्या आकलनाद्वारे ऊर्जा-कार्यक्षम इमारतींची रचना आणि हवामानाला प्रतिसाद देणाऱ्या वास्तुकलेवर केंद्रित आहे. बांधकाम व पर्यावरणार लक्ष केंद्रित करणारा हा भारतातील एकमेव कार्यक्रम आहे. हवामान आणि इमारतीच्या कार्यक्षमतेच्या आव्हानांशी संबंधित कन्सल्टिंग, संशोधन, व्यावसायिक कार्य आणि धोरण या क्षेत्रांमध्ये करिअर करण्याची इच्छा असणारे पदवीधर या एमबीईपी अभ्यासक्रमातून घडणार आहेत. इमारतींची ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे हा विषय गेल्या तीन दशकांहून अधिक काळापासून राष्ट्रीय प्राधान्याचा राहिलेला आहे. यासाठी अशा व्यावसायिकांची गरज आहे जे इमारतींमधील गुंतागुंतीचे ऊर्जा प्रवाह आणि प्रणाली समजू शकतील आणि किफायतशीर, कार्यक्षमतेवर आधारित, परवडणारे व विस्तारक्षम उपाय सुचवू शकतील. सेप्ट युनिव्हर्सिटीचा 'मास्टर्स प्रोग्राम इन बिल्डिंग एनर्जी परफॉर्मन्स' (एमबीईपी) हा अभ्यासक्रम ही गरज पूर्ण करतो. वास्तुकला, इमारत अभियांत्रिकी, इमारत भौतिकशास्त्र, मानवी शरीरशास्त्र आणि मानसशास्त्र यांसारख्या विविध क्षेत्रांना एकत्रित करणाऱ्या एका कठोर, आंतरविद्याशाखीय शिक्षण 'प्रयोगशाळे'द्वारे हे साध्य करण्यात येते. हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम विविध पार्श्वभूमीच्या (वास्तुकला, स्थापत्य आणि यांत्रिक अभियांत्रिकी) विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला आहे. याअंतर्गत वास्तविक जगातील प्रकल्प आणि एकात्मिक डिझाईन सरावांच्या माध्यमातून वाढत्या प्रमाणात कौशल्य वाढविण्यात येते. या अभ्यासक्रमाला सेप्टच्या कॅम्पसमधील अनेक अत्याधुनिक प्रयोगशाळा सुविधांचे पाठबळ लाभले आहे. त्या अभ्यासक्रमाचा एक अविभाज्य व महत्त्वाचा भाग आहेत. गेट परीक्षेत वैध गुण असलेले उमेदवार या कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार अर्ज करू शकतात. ज्या अर्जदारांनी 'गेट २०२६ 'परीक्षा दिलेली नाही किंवा ज्यांच्याकडे पात्रतेसाठीचे गुण नाहीत, त्यांच्यासाठी सेप्ट युनिव्हर्सिटीने एक पर्यायी मार्ग म्हणून सेप्ट पीजी टेस्ट उपलब्ध करून दिली आहे. ही परीक्षा ऑनलाइन घेण्यात येईल आणि दूरस्थपणे देता येईल. त्यामुळे सर्व भौगोलिक ठिकाणांमधील उमेदवारांना ती सहज उपलब्ध होईल.

## राजगुरूनगरला भक्तीमय वातावरणात राम जन्मोत्सव सोहळा साजरा



**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

कुलभूषणा, दशरथ नंदना बाळा जो जो रे, ''राम जन्मला गं सखी राम जन्मला' अशा पारंपारीक उत्साहात गीतगायन व पाळणा म्हणत दुपारी बारा वाजता राम जन्मोत्सव सोहळा येथील प्राचीन श्रीराम मंदिरात उत्साहात व भक्तीभावपुर्ण वातावरणात साजरा झाला. प्रभू श्रीरामाच्या मूर्तीवर अभिषेक करून पारंपरिक वस्त्र परिधान करून आभूषणं चढवण्यात आली. यावेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. राजगुरूनगर येथील ऐतिहासिक श्रीराम मंदिरात गुरुवारी (दि. २६) पहाटेपासूनच भाविकांनी रामनवमी निमित्ताने दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. काकड आरती नंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुलं करण्यात आले. तर दुपारी बारा वाजता राम जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्रीरामजन्माचे ह.भ.प. श्रीरामबुवा भिडे गुरुजी यांचे सुश्राव्य किर्तन झाले.

यावेळी बोलताना सचिन खेडकर व राजेंद्र सुतार यांनी सांगितले की, चैत्र शुद्ध नवमी हा दिवस हिंदू पंचागानुसार अत्यंत महत्वाचा दिवस आहे. या तिथीला भगवान विष्णूचा सातवा अवतार समजल्या जाणाऱ्या 'प्रभू श्रीरामचंद्राचा' जन्म झाला.




विमानशास्त्राची रोमांचक सफर घडवणारे

## २७, २८ रोजी 'सायन्स ऑफ फ्लाइट' प्रदर्शन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विमानशास्त्राविषयी सर्वसामान्यांमध्ये कुतूहल निर्माण करण्यासोबतच उड्डाणाच्या विज्ञानाची सखोल ओळख करून देणारे 'सायन्स ऑफ फ्लाइट' हे अनोखे प्रदर्शन २७ व २८ मार्च २०२६ या दोन दिवशी पाषाण येथील अरोमी येथे होणार आहे. एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया पुणे आणि प्रसिद्ध एरो मॉडेलर माधव खरे यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी खुले असलेल्या या प्रदर्शनासाठी प्रवेश मोफत असून, नोंदणी अनिवार्य आहे.

'सायन्स ऑफ फ्लाइट' प्रदर्शनातून प्राचीन काळापासून आधुनिक युगापर्यंतच्या उड्डाण यंत्रांच्या विकासाची सविस्तर आणि चित्रमय कथा उलगडणार आहे. १९९९ साली विज्ञान व तंत्रज्ञान विभागासाठी तयार करण्यात आलेल्या या प्रदर्शनामध्ये विमानशास्त्राच्या विविध टप्प्यांमागील विज्ञान सोप्या भाषेत समजावून सांगितले आहे. त्यामुळे विद्यार्थी, पालक आणि विज्ञानप्रेमी यांच्यासाठी हे प्रदर्शन एक ज्ञानमय पर्वणी ठरणार आहे. उडणाऱ्या मॉडेल्सची थेट प्रात्यक्षिके, घरातील तसेच मैदानी वापरासाठी तयार करण्यात आलेल्या विविध फ्लाइंग मॉडेल्सद्वारे विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा संगम प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. याशिवाय भारतात तयार केलेली फ्लाइंग मॉडेल्स किफायतशीर दरात खरेदी करण्याची संधीही येथे उपलब्ध आहे. तसेच, इच्छुकांसाठी वॉक-इन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून, सहभागी स्वतःचे उडणारे मॉडेल तयार करून विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊ शकतात. शाळांसाठी विशेष दुपारच्या वेळापत्रकाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, विद्यार्थ्यांना गर्दी टाळून प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे. विज्ञान आणि मनोरंजन यांचा सुंदर संगम असलेली ही संधी पुणेकरांनी साधावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# श्रीराम दरबारमध्ये श्रीराम नवमी उत्साहात साजरी

## हजारो राम भक्तांनी घेतले श्रीरामाचे दर्शन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जय श्रीराम चा जयघोष, श्रीराम जय राम जय जय राम मंत्राचा अखंड मंत्रोच्चार, विविध रामभक्तीपर गीतांचा जागर आणि हजारो राम भक्तांची उपस्थिती अशा भक्तिमय वातावरणात कोंढवा खुर्द येथील श्री संकट हरण महादेव मंदिराच्या आवारातील श्रीराम दरबार मध्ये श्रीराम नवमी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.

पवन बंसल आणि सुनीता बंसल यांनी आपला नातू मास्टर सरस बंसल याच्या स्मृतीनिमित्त कोंढवा खुर्द मधील श्री संकट हरण महादेव मंदिरामध्ये 2021 रोजी श्रीराम दरबार या मंदिराची स्थापना केली.या मंदिरामध्ये श्रीराम सेवा समितीच्या माध्यमातून यंदा सहाव्या वर्षी श्रीराम नवमी उत्सव थाटामाटात साजरा करण्यात आला. पवन बंसल, सुनीता बंसल, ईश्वरचंद गोयल, जयभगवान गोयल, पवन चमेडिया, गुंजन तवाल ,नरेंद्र गोयल ,प्रेमचंद मित्तल ,सतीश अग्रवाल ,योगेश जैन, गोयल गंगा ग्रुपच्या गीता गोयल, विक्रम बंसल रुची नरेंद्र गोयल, माजी नगरसेवक तानाजी लोणकर यांच्यासह हजारो राम भक्त या महोत्सवामध्ये सहभागी झाले होते. दुपारी बारा वाजता श्रीराम जन्म उत्सवाचा सोहळा थाटामाटात पार पडला.श्रीराम नवमी उत्सवानिमित्त संपूर्ण मंदिर परिसर विविधरंगी फुलांनी सजविण्यात आलेले होते. विविध रंगी सजावट आणि आकर्षक रोषणाई यामुळे मंदिर परिसर उजळून निघाला होता.मंदिरामध्ये आयोजित करण्यात आलेले भजन, आरती आणि धार्मिक कार्यक्रमामुळे मंदिर परिसरामध्ये अतिशय भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला.

महोत्सवा संदर्भात पवन बंसल म्हणाले, दरवर्षी रामनवमी या मंदिरामध्ये अतिशय उत्साहात साजरी करण्यात येते.याच्या माध्यमातून श्रीरामांचा आशीर्वाद सर्व जनतेला मिळत आहे याचा आम्हाला आनंद आहे. सुनिता बंसल म्हणाल्या, आमचा नातू सरस बंसल याच्या स्मृतीनिमित्त उभारण्यात आलेल्या या मंदिराच्या माध्यमातून आम्हाला श्रीराम भक्तांची सेवा करण्याची दरवर्षी संधी मिळत आहे ही आमच्यासाठी अतिशय भाग्याची गोष्ट आहे.

तानाजी लोणकर म्हणाले 1868 रोजी श्री संकट हरण महादेव मंदिर स्थापन करण्यात आले त्यानंतर या मंदिरामध्ये विविध देवतांची मंदिरे निर्माण करण्यात आली पवन कुमार बंसल यांच्या माध्यमातून 1921 रोजी श्रीराम दरबार हे प्रभू रामाचे मंदिर स्थापन करण्यात आले यामध्ये दरवर्षी श्रीराम नवमी उत्सव उत्साह साजरा करण्यात येतो आणि सुमारे 50 हजार भाविक यामध्ये सहभागी होतात.

गीता गोयल म्हणाल्या, आम्हाला श्रीराम दरबार या मंदिराच्या मुळे श्रीराम नवमीच नव्हे तर इतर वेळी ही श्रीराम भक्तांची सेवा करण्याची संधी मिळत आहे त्यामुळे हा आमच्यासाठी भाग्याचा क्षण आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.